महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/उसप-२०२६/पाच/ 1921

दिनांक : 28 OCT 2026

वाचावे : कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/उसप-२०२६/पाच/ E-३४६८१५६, दिनांक ०५.१०.२०२६

परिपत्रक

विषय : उच्चकला प्रथम सत्र परीक्षा (शैक्षणिक वर्ष २०२६-२७)
विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र (Exam Form) ऑनलाईन सादर करणेबाबत.

उपरोक्त वाचावे येथील दिनांक ०५.१०.२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये मंडळाशी संलग्नित कला परिसंस्थांमध्ये कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता दिनांक २५.११.२०२६ पासून सुरु होणाऱ्या **प्रथम सत्र (First Semester)** परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

०२. त्यानुषंगाने, कला शिक्षण मंडळाशी संलग्नित कला परिसंस्थांना कळविण्यात येते की, प्रथम सत्र परीक्षेकरिता आपल्या कला परिसंस्थेमधील पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या पात्र नियमित (Reguler)/ पूर्नप्रविष्ठ (Repeater) विद्यार्थ्यांचे **परीक्षा आवेदनपत्र** उच्चकला सत्र परीक्षेच्या **https://hae.semesterpattern.msbae.in** या लिंकवर कला परिसंस्थेच्या लॉगिनवरुन खालील नमूद कालावधीत ऑनलाईन सादर करावे. सदर लिंक कला शिक्षण मंडळाच्या **https://msbae.ac.in** या संकतेस्थळावर Higher Art Exam या मेनूअंतर्गत Higher Art Examination (Semester Pattern) या टॅबमध्येही उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तपशील	कालावधी
विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन सादर करणे (कला परिसंस्थेमार्फत)	**दि.३०.१०.२०२६ ते दि.०५.११.२०२६**

०३. परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याकरिता लागणारे गोपनीय युजरनेम व पासवर्ड कला परिसंस्थेचे प्रमुख (कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य) यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर/ई-मेलवर यापूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. परीक्षा आवेदनपत्र सादर करण्यास कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसल्यामुळे, कला परिसंसस्थांनी प्रथम सत्र परीक्षेकरिता विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र विहित कालावधीत ऑनलाईन पध्दतीने सादर करावे.

०४. परीक्षा शुल्क व परीक्षेचे साहित्य याबाबत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
४) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था. (मंडळाशी संलग्नित)

प्रत : माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

१) मा. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर

४) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

५) निवड नस्ती.